# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१३
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-**

(१) **ग्रामविकास मंत्री** : (अ) "सन २०१०-२०११ चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील चाळीसावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(ब) "सन २०११-१२ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३३ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : (अ) "पुणे विद्यापीठाचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल", सभागृहासमोर ठेवतील.

(ब) "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, यांचे सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह)", सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

चार : **लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. गोपीकिसन बाजोरिया,** डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शेगांव, खामगांव, नांदूरा या तालूक्यांचा बुलढाणा जिल्ह्यात समावेश होणे, उपरोक्त गावांतील नगरपालिका क्षेत्राचा झपाट्याने होत असलेला विकास, ब्रिटीश काळापासून उपरोक्त गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात सातत्याने शासनाकडे होत असलेली मागणी, तसेच येथील नागरीक नगरपालिकेचा कर न भरताच तेथील सोयीसवलतींचा लाभ घेत असणे, यामुळे, शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडणे, परिणामी शासनाचे लाखे रुपयांचे होणारे नुकसान, याप्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून उपरोक्त जिल्ह्यातील शेगांव, खामगांव, नांदूरा ह्या गावांची हद्दवाढ करण्यासंदर्भात निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **सर्वश्री हेमंत टकले,** किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ. अपूर्व हिरे, सर्वश्री मितेश भांगडिया, नागो गाणार, विनोद तावडे, अनिल तटकरे, राजेंद्र जैन, संदीप बाजोरिया, प्रकाश बिनसाळे, विजय सावंत **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मे व जून महिन्यात झालेल्या वादळी पावसामुळे झालेले प्रचंड नुकसान, विदर्भातील गोंदिया, वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, तसेच जिल्हा सातारा येथील पाटण तालुक्यातील ढेबेवाडी, तळमावले व कुंभारगाव परिसर येथे अनेक घरांची झालेली पडझड, घरात पाणी शिरुन घरांचे झालेले नुकसान, रायगड तीन व्यक्ती व सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन व्यक्तींचा झालेला मृत्यु, नाशिक, जळगाव, व अन्य कळवण, सटाणा, सुरगाणा, हरसुल, इत्यादी विविध तालुक्यांमध्ये केळी, भात, नागली, डाळिंब, कांदा, टॉमेटो, शेवगा, गहू, द्राक्ष्य इत्यादी पिकांचे झालेले अतोनात नुकसान, हरसूल तालुक्यात देवडोंगरी मध्ये वीज कोसळून शाळकरी मुलाचा झालेला मृत्यू, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात सोयाबीन, धान, कापूस या पिकांचे झालेले नुकसान, अनेक स्थानिक पूरग्रस्त भागाचे सर्वेक्षण न होणे, शासनाकडून शेतकऱ्यांना व आपदग्रस्तांना कोणतीही मदत अद्याप ही प्राप्त न होणे, परिणामी शेतकरी व तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या आपत्तीमुळे बेघर झालेल्या कुटूबांचे पुनर्वसन करणे व आपदग्रस्तांना तातडीने मदत

मिळण्याची होत असेलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(३) **सर्वश्री. भगवान साळुंखे,** रामनाथ मोते, नागो गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, श्री.नितीन गडकरी **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाने दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयाने प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीवर बंदी घालणे, त्यानंतर दिनांक १९ जानेवारी, २०१३ व दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयाने शिक्षक भरतीसाठी सेवाप्रवेशापूर्व परिक्षा (सी.ई.टी) आणि शिक्षक क्षमता चाचणी परिक्षा (टी.ई.टी.) लागू करणे, या परिक्षांचे स्वरुपाबाबत स्पष्टता नसणे, सन २०१२-१३ व चालू शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये सेवानिवृत्ती वाढीव पदे व वाढीव तुकड्या इत्यादीमध्ये शिक्षकांची पदे निर्माण झालेली असणे, ती भरली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, अशा गंभीर परिस्थितीमध्ये शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सहा : सन २०१३-२०१४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) -**
**खालील मंत्र्यांच्या संबंधीत विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल :-**

१. **मुख्यमंत्री**

२. **उप मुख्यमंत्री**

३. **सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त/भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्री**

४. **आदिवासी विकास मंत्री**

५. **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**

६. **शालेय शिक्षण मंत्री**

७. **वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्री**

८. **सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण आणि राजशिष्टाचार मंत्री**

९. **क्रिडा व युवककल्याण मंत्री**

१०. **महिला व बालविकास मंत्री**

११. **पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री**

१२. **पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री**

१३. **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**सात : शासकीय विधेयके :-**

**(१) विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३.

**क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा

(सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ७ - महाराष्ट्र पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**आठ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**(अ) सर्वश्री.विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजीत पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो गाणार, भगवान साळुंखे **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"गत दीड वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये सिंचनाचे विविध घोटाळे पुराव्यानिशी सभागृहात मांडूनदेखील त्याबाबत साधी चौकशी करण्याची बाबदेखील शासनाकडून मान्य करण्यात न येणे, सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार मान्य न करता घोटाळयाची रंगसफेदी करणारी श्वेतपत्रिका शासनाकडून काढण्यात येणे, वस्तुस्थितीवर आधारित श्वेतपत्रिका नसल्याने हिवाळी अधिवेशन, २०१२ मध्ये सलग ५ दिवस विरोधी पक्षाने सभागृहात आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संपूर्ण घोटाळयाची एस.आय.टी. मार्फत चौकशी करण्याचे मान्य करण्यात येणे, सदर एस.आय.टी. ची स्थापना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत असावी व एस.आय.टी. च्या कार्यकक्षेमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा याबाबतचे पत्र मा.मुख्यमंत्री महोदयांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांच्यामार्फत देण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र एस.आय.टी. स्थापन करताना कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्ट अंतर्गत समितीची स्थापना करण्यात न येणे, समितीच्या अध्यक्षांना विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी सिंचन घोटाळयाची काही कागदपत्र तपासाकरिता सादर करण्याबाबत पत्र दिले असता समिती अध्यक्ष श्री.चितळे यांनी समितीला तसा

अधिकार नसल्याचे प्रतिपादन करणे, ही बाब लक्षात घेवून सिंचनातील भ्रष्टाचार बाहेर पडण्यासाठी श्री.चितळे यांनी सर्व प्रकारच्या तक्रारी चौकशी करण्याची मागणी तसेच एस.आय.टी. ची कार्यकक्षा बदलण्याची मागणी सभागृहात करणे, परंतू शासनाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे, शासनाकडून याबाबत सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत शासनाच्या भूमिकेबाबत कोट्यावधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, सिंचन गैरव्यवहाराचा योग्यरितीने तपास होण्यासाठी एस.आय.टी.च्या कार्यकक्षेत व रचनेत बदल करण्याची आवश्यकता, विचारात घेण्यात यावी."

(ब) **सर्वश्री.माणिकराव ठाकरे,** सुभाष चव्हाण, हेमंत टकले, शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील, सय्यद मुझफ्फर हुसेन, प्रा.सुरेश नवले **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" लोकांना स्वस्तात धान्य देण्याची लोक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने माहे जुलै, २०१३ मध्ये जारी केलेला अन्न सुरक्षा अध्यादेश या योजनेमुळे देशातील सुमारे ७० कोटी जनतेला दरमहा रु.३ प्रमाणे ५ किलो तांदूळ, रु.२ प्रमाणे ५ किलो गहु व रु.१ प्रमाणे ५ किलो कडधान्य मिळणार असून, देशातील ६७ टक्के लोकांना अन्नाची सुरक्षितता यामधून मिळणार असणे, माणसाच्या मूलभूत गरजांपैकी अन्न या मुलभूत गरजेचा अधिकार अन्न सुरक्षा अध्यादेश जारी करुन लोकांना देण्यात येणे, केंद्र सरकारने दिलेल्या मुदतीच्या आत ही योजना सुरू करण्यात येणार असणे, महाराष्ट्रातील ७५ टक्के ग्रामीण व ५० टक्के शहरी लोकांना तसेच, शालेय विद्यार्थ्यांना या योजनेतून कमी दरात अन्न पुरवठा होणार असणे, ही योजना राज्यात राबविताना सर्व मुलभूत बाबींची पुर्तता राज्य शासनाला करावी लागणार असणे, त्यात धान्याची वितरण व्यवस्था, धान्य साठविण्यासाठी गोदामांची गरज इत्यांदीची व्यवस्था करणे गरजेचे असणे, धान्याच्या वितरणासाठी वाहनांची व्यवस्था, तसेच, धान्य उत्पादन ते वितरण या साखळीतील प्रत्येक कच्चा दुवा सुधारण्याची आवश्यकता असणे, राज्यात ग्रामीण, दुर्गम, मागास भागातील लोकांपर्यंत व सर्व लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा व्हावा यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी लागणार असून, प्रत्येक लाभार्थ्याला या योजनेचा

सुलभतेने व वेळेत लाभ मिळावा यादृष्टीने अन्न सुरक्षा योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपायोजना, विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

"महिलांवरील अत्याचारांचे वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित असलेले खटले लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत" या विषयावरील श्री.संजय दत्त व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३७४५७ ला दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

"पुणे जिल्ह्यातील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेबाबत " या विषयावरील ॲड.जयदेव गायकवाड व इतर, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३७२७६ ला दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ जुलै, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.